॥ परिकथेंतिल राजकुमारा ॥

परिकथेंतील राजकुमारा स्वप्नीं माझ्या येशिल का?
भाव दाटले मनीं अनामिक साद तयांना देशिल का ? ॥धृ.॥

या डोळ्यांचे गूढ इषारे
शब्दांवांचुन जाणुन सारें
राणी अपुली मला म्हणोनी तुझियासंगें नेशिल का ? ॥ १ ॥

मूर्त मनोरम मनीं रेखिली
दिवसारात्रीं नित्य देखिली
त्या रूपाची साक्ष जिवाला प्रत्यक्षांतुन देशिल का ? ॥ २ ॥

लाजुन डोळे लववित खालीं
नवऱ्या गालीं येइल लाली
फुलापरी ही तनू कापरी हृदयापाशीं घेशिल का ? ॥ ३ ॥

लाजबावरी मिटुन पापणी
साठवीन तें चित्र लोचनीं
नवरंगी त्या चित्रामधलें स्वप्नच माझें होशिल का ? ॥४ ॥

कवयित्री वंदना विटणकर

संगीतकार अनिल मोहिले
गायिका कृष्णा कल्ले

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 18, 1999